संक्षिप्त वृत्त

'आपला बायोस्कोप २०२३' पुरस्काराची घोषणा

मुंबई : महाराष्ट्रातील नंबर १ मराठी न्यूज चॅनेल टीव्ही ९ मराठीच्यावतीने 'आपला बायोस्कोप २०२३' या पुरस्कार सोहळ्याची घोषणा झाल्यापासून या पुरस्कारांसाठी मराठी सिनेसृष्टीत उत्सुकता निर्माण झाली आहे. 'आपला बायोस्कोप २०२३' या पुरस्कारासाठी नामांकने जाहीर झाली असून सगळ्या विभागात कमालीची चुरस आहे. परिक्षक आणि प्रेक्षक पसंतीचा कौल ध्यानात घेत विजेते ठरणार आहेत.

केसांसाठी कोकोनट हेअर ऑईल परिपूर्ण

पुणे : तुमच्या केसांसाठी कोकोनट हेअर ऑईल अगदी परिपूर्ण आहे. कोकोनट हेअर ऑईल केसांना मॉइश्चरायझेशन व पोषण देते. तसेच जॅस्मीन-युक्त कोकोनट हेअर ऑईलचा वापर केल्याने मन शांत राहण्यास मदत होते. उत्साहवर्धक सुगंध व्यक्तीचा मूड उत्साहित करतो, तसेच तणाव कमी करतो. व्हिटॅमिन ई आणि मोठ्या प्रमाणात ॲण्टीऑक्सिडण्ट्सने संपन्न पॅराशूट ॲडवान्स जॅस्मीन कोकोनट नॉन-स्टिकी हेअर ऑईल अभ्यंग स्नानादरम्यान वापरल्या जाणाऱ्या तेलासाठी सानुकूल निवड आहे.

सकाळी लवकर उठायचं' साँग प्रेक्षकांच्या भेटीला

मुंबई : 'सलमान सोसायटी' चित्रपटाचे नवीन साँग सोशल मीडियावर रिलीज करण्यात आला आहे. नुकत्याच आलेल्या ट्रेलरमध्ये खूप इमोशन, ड्रामा आणि कॉमेडीची ही किनार होती. हा चित्रपट समाजातील अनाथ मुले आणि शिक्षणापासून वंचित मुलांवर भाष्य करतो. नवीन साँग 'सकाळी लवकर उठायचं' मध्ये ही दिवस आहे. हे गाणे देवकी भोंडवेने गायले असून या चित्रपटात एक महत्वपूर्ण भूमिका देखील साकारली आहे. प्राजक्ता एंटरप्राइजेस निर्मित, अवंतिका दत्तात्रय पाटील आणि व्हिडियो पॅलेस प्रस्तुत सलमान सोसायटी १७ नोव्हेंबर २०२३ ला सर्व चित्रपटग्रहात प्रदर्शित होत असून म्युझीक व्हिडियो पॅलेसवर उपलब्ध आहे.

तीन वर्षाचा मुलगा वाजवतोय ड्रम सेट्स

दुबई : हल्लीची मुलं ही फारच हुशार आहेत, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. ही मुलं कुठलीही गोष्ट अगदी सहजरित्या शिकतात. मग ते मोबाईलवर गेम्स खेळणं असो, वा कुठलीही कला असो. अल्पावधीच ही मुलं त्या गोष्टीत अगदी पारंगत हेऊन जातात. अशाच एका टॅलेंडेट चिमुकल्याचा व्हिडिओसमोर आला आहे. हा तीन वर्षांचा मुलगा चक्क एक ड्रम सेट वाजवतोय. आता तुम्ही म्हणाल, मग त्यात काय विशेष? अहो, तो एका प्रोफेशनल कार्यक्रमात लाखो प्रेक्षकांसमोर स्टेजवर ड्रम सेट वाजवून एका रॉक बँडला लीड करतोय. तो ज्या पद्धतीनं ड्रम्स वाजवतोय ते पाहून खरंच तुम्ही सुद्धा शॉक व्हाल. असं वाटतंय एखादा २०-२५ वर्ष सराव केलेला रॉकस्टार ड्रम्स वाजवतोय की काय असंच वाटतंय.

बाळासाहेबांच्या नावाने सुरु असलेल्या योजनेला मुदतवाढ, निधीही वाढवला

सुराज्य/मुंबई

राज्यातील ग्रामपंचायत इमारतींच्या कामांसाठी निधी वाढविण्याचा तसेच बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेलाही मुदतवाढ देण्याचा निर्णय शुक्रवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकींच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. आता ही योजना २०२७-२८ या वर्षापर्यंत राबविण्यात येईल.

स्वतंत्र इमारत नसलेल्या २००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १५ लाख ऐवजी २० लाख रुपये आणि २००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १८ लाख ऐवजी २५ लाख अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापूर्वी ग्रामपंचायत स्वनिधीची असलेली अटदेखील रद्द करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत बांधकामासाठी यापेक्षा अधिक निधीची आवश्यकता अतिरिक्त निधी केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजना, वित्त आयोग निधी, जिल्हा ग्राम विकास निधी, स्थानिक विकास निधी (खासदार, आमदार निधी) इ. बाबींमधून देण्यात येईल.

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नाही, अशा ४२५२ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेस २०१८-१९ ते २०२१-२२ या ४ वर्षांसाठी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार १७४८ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम सुरू असून यासाठी आतापर्यंत ३८१३.५० लाख रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

पांडुरंग कारखान्याचा पहिला हप्ता २८०० रुपयांप्रमाणे जाहीर

- चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी वाखरी कारखाना ऑफिस येथे केली घोषणा
- २८०० रुपये जिल्हात एक नंबरचा पहिला हप्ता

सुराज्य/श्रीपूर

श्रीपूर (माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा पहिला हप्ता २८०० रुपयांप्रमाणे दर देण्याची घोषणा घोषणा चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी वाखरी कारखाना ऑफिस येथे केली.

यावेळी व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी शेतकी अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर आदी उपस्थित होते.

आ.प्रशांतराव परिचारक चेअरमन | कैलास खुळे व्हा.चेअरमन | डॉ.यशवंत कुलकर्णी कार्यकारी संचालक

पांडुरंग कारखाना पहिला हप्ता २८०० रुपये देणार आहे. दि. ६ जानेवारीपासून ३१ जानेवारीपर्यंत उशिराने येणाऱ्या उसास २८५० रुपये पहिला हप्ता देणार आहे. दि. १ फेब्रुवारीपासून २८ फेब्रुवारीपर्यंत उशिराने गाळप होणाऱ्या उसास २९०० रुपये पहिला देण्यात येणार आहे. १ मार्चपासून उशिराने गाळापासाठी येणाऱ्या उसास २९५० रुपये इतका पहिला हप्ता देण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये उच्चांकी गाळप क्षमतेने सुरू असून, या हंगामात ११ ते १२ लाख मॅट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट कारखान्याने ठेवले आहे. कारखाना चालू गळीत हंगामात ८ हजार ५०० मेट्रिक टन प्रति दिन गाळप केले जाणार आहे. कारखान्याचा डिस्टलरी प्रकल्प ९० केएलपीडी क्षमतेने व्यवस्थित सुरू आहे. को जनरेशन ही सुरू असून त्यातून जास्तीत जास्त वीज एक्सपोर्ट करीत आहे. पांडुरंग जल्हात पहिला हप्ता एक नंबरचा देत असूनख सभासद व शेतकरी बांधवांनी पांडुरंग कारखान्यास गाळपासाठी ऊस द्यावा असे आव्हान चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी केले.

यावेळी व्हा.चेअरमन कैलास खुळे, दीनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वायम हेडे, बाळासो यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वायमारे, गंगाराम विभुते, हणमंत कदम सुदाम मोरे, विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, सिताराम शिंदे, राणू पाटील, दाजी पाटील, दिलीप गुरव, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, शेतकी अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर उपस्थित होते.

पीक विमा अग्रीम, रब्बी हंगामातील पेरणीची टक्केवारी

मंत्रिमंडळ बैठकीतून कृषी क्षेत्राबाबत महत्त्वाची माहिती

मुंबई : प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील विम्याच्या अग्रीम रक्कमचे वाटप वेगाने सुरु असून आतापर्यंत ४७ लाख ६३ हजार नुकसान भरपाई अर्जांना मंजुरी मिळाली असून १ हजार ९५४ कोटी रुपये वाटप होणार आहेत. यापैकी ९६५ कोटी रक्कम वाटण्यात आली असून उर्वरित रक्कम वाटण्याचे काम प्रगतीपथावर आहे, अशी माहिती शुक्रवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत कृषी विभागाच्या सादरीकरणात देण्यात आली.

खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसानीसंदर्भात एकंदरीत २४ जिल्ह्यांसाठी अधिसूचना काढण्यात आली होती.

आता १२ जिल्ह्यांमध्ये या अधिसूचनेवर विमा कंपन्यांचे कोणतेही आक्षेप नसून ९ जिल्ह्यांमध्ये अंशत: आक्षेप आहेत.

राज्य स्तरावर सध्या बीड, बुलढाणा, वाशिम, नंदूरबार, धुळे, नाशिक, अहमदनगर, पुणे, अमरावती अशा ९ जिल्ह्यांमध्ये विमा कंपन्यांच्या आक्षेपावर अपील सुनावणी सुरु असून पुणे आणि अमरावती वगळता इतर ठिकाणची सुनावणी संपली आहे.

हिऱ्यांच्या बाजारपेठेला नाशिकमध्ये पडताहेत 'पैलू'

सुराज्य/नाशिक



दागिने म्हटले की सोने, हा एकेकाळचा समज मागे पडत चालला असून, नाशिककर आता हिऱ्यांकडे वळू लागले आहेत. शहरातील हिऱ्यांच्या बाजारपेठेला गेल्या काही वर्षांपासून पैलू पडत असून, तरुणाईसह उच्च मध्यमवर्गीयांकडून हिऱ्यांच्या दागिने खरेदीला पसंती लाभत आहे.

नाशिकमध्ये काही वर्षांपूर्वी हिऱ्यांविषयी फार जागृती नव्हती. त्यामुळे लोक सोने-चांदी खरेदीलाच प्राधान्य देत असत. गुंतवणुकीसाठीही त्यांचाच विचार केला जात असे. मात्र, शहरात नामवंत ब्रॅण्ड्सचे शोरूम दाखल झाल्यानंतर हिऱ्यांचे व्यवहार वाढले. सध्या नाशिकमध्ये चार हजार रुपयांपासून ते लाखो रुपयांपर्यंतचे हिरे उपलब्ध आहेत. शहरातील बहुतांश हिरे सुरत व मुंबईतून येतात. ग्राहकांच्या मागणीमुळे आता शहरातील बहुतांश सराफी पेढ्यांवर हिऱ्यांचे दागिने उपलब्ध करून दिले जातात. कट', क्लिॲरिटी', कलर' व कॅरेट' या चार 'सी'च्या निकषांनी हिऱ्याची पारख केली जाते व किंमत ठरवली जाते. जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका (जीआयए) यासारख्या मोजक्या संस्थांकडून हिऱ्याची पारख होते. दागिन्यात हिरा यट्ट बसावा, यासाठी जरा कठीण सोने आवश्यक असते. त्यामुळे हिऱ्यासाठीचे दागिने शक्यतो १८ कॅरेट सोन्यामध्ये घडवले जातात. मागील काही काळापासून रोझ गोल्ड व प्लॅटिनममध्येही हिऱ्याचे दागिने साकारले जात आहेत, असे सराफ व्यावसायिकांनी सांगितले.

कांद्याने रडवलेच!

इजिप्तकडून कांदा निर्यातीवर बंदी

स्थानिक बाजारपेठेत भाव पुन्हा वाढणार

सुराज्य/नाशिक

इजिप्तने कांद्यास पुढील तीन महिन्यांसाठी निर्यातबंदी केल्याने अप्रत्यक्षरीत्या केंद्र सरकारचा कांदा आयात करण्याचा एक दरवाजा बंद झाला आहे. स्थानिक बाजारपेठेत उन्हाळ कांदा संपुष्टात आल्याने अन् कांद्याचे उत्पादन घटल्याने कांदादराने उसळी घेतली आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कांद्याचे ग्राहककेंद्री राजकारण करण्यासाठी सरकारच्या हाती जास्तीच्या कांद्याची आवश्यकता आहे. मात्र, बाजारातील कांद्याची तूट ही मागणी व पुरवठ्यातील अंतर वाढवीत असल्याने दिवाळीनंतरही कांद्याचे दर टिकून आहेत. दुसरीकडे स्थानिक बाजारातील कांद्याचे दर आवाक्यात राहण्यासाठी केंद्राने लागू केलेले निर्यातमूल्य डिसेंबरअखेरपर्यंत राहील.

दरम्यान, इजिप्तच्या कांद्याबाबत संभ्रमित करणारी माहिती सामाजिक माध्यमांद्वारे प्रसारित केली जात आहे. त्यामुळे याबाबतच्या वृत्ताची खातरजमा करून घेण्याचे आवाहन राज्य उत्पादक संघटनेने केले आहे. डिसेंबरअखेरपर्यंत संपुष्टात आलेल्या उन्हाळ कांद्यासह नव्याने येणाऱ्या लाल कांद्याला मिळणारा दर स्थिर राहील, असे व्यापारीवर्गाचे मत आहे.

बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र विडी कामगार सेनेच्यावतीने आदरांजली वाहण्यात आली. त्यावेळी पुरुषोत्तम बरडे, विष्णू कारमपुरी, रेखा आडकी आदी मान्यवर उपस्थित होते.

सुराज्य/सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्यावतीने शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्र विडी कामगार सेनेतर्फे कामगार सेना, पद्मशाली चौक येथे सोलापूर लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्या हस्ते बाळासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी पुरुषोत्तम बरडे, विष्णू कारमपुरी, विठ्ठल कुराडकर, रेखा आडकी, अमित भोसले, शिवा कोळी, सुरेश शिंदे, मिरा लच्छुवाले, श्रीनिवास बोगा, शोभा पोला, पप्पू शेख, संभाजी कोडगे, गुरुनाथ कोळी, शरणप्पा जगले उपस्थित होते.

निधन वृत्त

हौसाबाई कवडे

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ येथील हौसाबाई कृष्णात कवडे यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्या १०५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

निर्मला भुट्टे

उत्तर सोलापूर : कारंबा येथील निर्मला उत्तरेश्वर भुट्टे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ६० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. बाजार समितीचे माजी संचालक उत्तरेश्वर भुट्टे यांच्या त्या पत्नी होत.

छगन भुजबळांची मंत्रिपदावरुन हकालपट्टी करा

संभाजीराजे छत्रपतींची मागणी तर मनोज जरांगेंचेही टीकास्त्र

संभाजीराजे छत्रपती काय म्हणाले?

छगन भुजबळ हे राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य ओबीसी बांधवांचा मराठा समाजास कोणताही विरोध नसताना केवळ आपले राजकीय स्थान टिकवण्यासाठी दोन समाजांत नसलेली भांडणं लावण्याचं पाप करत आहेत. सरकारमधील एक मंत्री उघडपणे वेगळी भूमिका घेऊन जातीय तेढ निर्माण करत असेल तर सरकारची देखील हीच भूमिका आहे का ? हे स्पष्ट करावे अन्यथा छगन भुजबळ यांची मंत्री पदावरून हकालपट्टी करावी,अशी मागणी संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे.

सुराज्य/मुंबई

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील धाईत नगर येथे ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभा पार पडली. या सभेत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे-पाटील यांच्या भूमिकेवर जोरदार हल्लाबोल केला. मनोज जरांगे यांच्यावर भुजबळ यांनी टीकास्त्र सोडलं. ओबीसी समाजाचं आरक्षण वाचवण्यासाठी एकत्र आलं पाहिजे, अशी भूमिका भुजबळ यांनी मांडली.

भुजबळ यांच्या जालन्यातील आक्रमक भाषणाचे राजकीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी ट्वीट करुन छगन भुजबळ यांच्या हकालपट्टीची मागणी केली आहे. तर, मनोज जरांगे यांनी देखील राजकीय नेत्यांनी कितीही वक्तव्य केली तरी मराठा आणि ओबीसी समजात संघर्ष निर्माण होणार नाहीस असं म्हटलं.

छगन भुजबळ हे राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य ओबीसी बांधवांचा मराठा समाजास कोणताही विरोध नसताना केवळ आपले राजकीय स्थान टिकवण्यासाठी दोन समाजांत नसलेली भांडणं लावण्याचं पाप करत आहेत.

दंगली पेटवण्याचा प्रयत्न:जरांगे पाटील

राजकीय नेत्यांनी कितीही प्रयत्न केला तरी मराठा आणि ओबीसी यामध्ये कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण होणार नाही. मात्र छगन भुजबळ हे वादग्रस्त वक्तव्य करून राज्यात दंगली पेटवण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांच्या षड्यंत्र यशस्वी होणार नाही, असं वक्तव्य मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी व्यक्त केले आहे.

सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत जरांगे-पाटील हे बोलत होते. छगन भुजबळ हे माझ्यावर वैयक्तिक टीका करत असून ते खालच्या पातळीवरच राजकारण करत आहेत. माझ्यावर टीका करण्या अगोदर तुम्ही पैसे खावून, जेल भोगून आला आहात याची आठवण तुम्हाला असू दे, असा टोलाही जरांगे-पाटील यांनी लगावला. मराठ्यांना आरक्षण मिळाल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही, त्यामुळे मराठा बांधवांनी सुध्दा १ डिसेंबर २०२३ पासून प्रत्येक गावात साखळी उपोषण करावे, असे आवाहन जरांगे-पाटील यांनी केले.

महाराष्ट्रातील अवलियाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका

कोतवाल पक्ष्याचे छायाचित्र टिपले अन् मिळवला एफआयआयएन पुरस्कार

सुराज्य/नागपूर

देश आणि जगभरातील जंगलांची भ्रमंती करून एकाहून एक सरस वाइल्डलाइफ फोटो काढत आजवर १३२ हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय छायाचित्र स्पर्धेत पुरस्कार मिळवणाऱ्या बैजू पाटील यांच्या विंग्ज ऑन फायर' या बर्ड कॅटेगिरीतील ड्रोंगो म्हणजेच कोतवाल पक्ष्याच्या छायाचित्राला जगातील पहिले पारितोषिक मिळाले आहे.

जागतिक स्तरावरील 'एफआयआयएन' हा पुरस्कार मिळाला. जगभरातून आलेल्या ८८०० फोटोंमध्ये बैजू यांच्या फोटोला पहिला मान मिळाला. पोर्तुगाल गाला येथे नुकताच पुरस्कार सोहळा पार पडला. महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ फोटोग्राफी विभागाचे बैजू पाटील हे विभागप्रमुख आहेत. बैजू पाटील गेल्या ३७ वर्षांपासून या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करत आहेत. वाइल्डलाइफ क्षेत्रातील अतिशय दुर्मिळ असे क्षण त्यांनी कॅमेऱ्यात टिपले आहेत. पुरस्कार प्राप्त पक्ष्याचा हा फोटो बैजू यांनी बीड जिल्ह्यातील धारूर येथे जाऊन काढला आहे.

आग लागल्यानंतरही किडे खाण्यासाठी त्यांची नेमकी धडपड कशी असते याची पूर्ण माहिती येतल्यानंतर त्या भागात तळ ठोकून कॅमेऱ्यात टिपेपर्यंत त्यांनी माघार येतली नाही. शेवटी मागील वर्षी हा फोटो येण्यात त्यांना यश मिळाले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल बैजू पाटील यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.